# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

ज. क्र. 614 / शि वि / स.शि.अ. दिनांक – 15 / 06 / 2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
प्राथमिक / उच्च प्राथ / माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

विषय :— सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१५—१६ या वर्षामध्ये शाळा व्यवस्थापन समितीस्तरावरून गणवेश उपलब्ध करून देण्याबाबत काही मार्गदर्शक सूचना.

संदर्भ :— १) कार्यालयीन आदेश क्र. मनपा / शि.वि. / शिक्षण / प्राथ / सशिअ / ५८८ / १५, सशिअ मनपा. नागपूर दि. ०२ / ०६ / २०१५.
२)मप्राशिप / सशिअ / गणवेश / का.अ. / २०१५—१६१२८१०,दि. २१ / ५ / १५
३) शिक्षण उपसंचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. प्राशिस / १५—१६ / शाळा / ५—५०५२१८६ / दि. २२ / ०५ / २०१५
४) मप्राशिप / सशिअ / गणवेश / का.अ. / २०१५—१६ / १४७८, दि. १२ जून, २०१५ अन्वये

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१५—१६, या वर्षामध्ये लाभार्थी विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरून गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी पत्र क्र. ४८१ / शि.वि. / सशिअ / दिनांक १६ / ०२ / २०१५ व कार्यालयीन आदेश क्र. ५८८ दि. २ जून, २०१५ नूसार सविस्तर मार्गदर्शक सूचना व निधी वर्ग करण्यात आलेला आहे.

१) शालेय विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचा शालेय गणवेश शाळेच्या प्रारंभीच्या दिवशी उपलब्ध व्हावा. या हेतूने शाळा व्यवस्थापन समितीस संपूर्ण अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

२) शालेय गणवेशाकरीता निवडले जाणारे कापड, शिलाई याचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे. याकरीता शाळा व्यवस्थापन समितीने तांत्रिक समिती गठीत करून गणवेशाचे कापड आणि शिलाई बाबतच्या दर्जाची तपासणी करून त्याबाबतच्या तांत्रिक नोंदी जड संग्रह नोंद वहीत Stock Register मध्ये कराव्यात.

३) शाळा व्यवस्थापन समिती व त्यांच्या मार्गदर्शना खालील तांत्रिक समितीस, आवश्यकता वाटल्यास कापड तयार करण्याऱ्या केंद्रीय शासकिय संस्था, Lab test करून कपाडयाच्या गुणवत्तेबद्दल खात्री देत असल्यास त्यांची खरेदी करणे उत्तम राहील.

४) सन २०१५–१६ मध्ये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे प्रपत्रात सादर करावा.

| अ.क्र. | शाळेचे नांव | मंजूर विद्यार्थी संख्या | | | कापडासाठी दरपत्रके काढल्याचा दिनांक | शिलाईसाठी दरपत्रके काढल्याचा दिनांक | निधी प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

| कार्यादेश क्रमांक, दिनांक पुरवठादाराचे नांव | कापड खरेदीचा दिनांक | कापड खरेदी करून शिलाईसाठी कापड दिल्याचा दिनांक | शिलाई करून गणवेश पुरवठा करण्याचा दिनांक | २७ जून, २०१५ रोजी गणवेश वाटप केल्याची संख्या | विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले नसल्यास कारणे |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | |

उपरोक्त माहिती शाळा निरिक्षक व साधन व्यक्तिकडे दिनांक २७ जून, २०१५ रोजी देणे आवश्यक आहे. शाळा निरिक्षकांनी सदर माहितीचे संकलन साधनव्यक्ति मार्फत करून स्वाक्षरीची एक प्रत यूआरसी स्तरावर ठेवून समन्वयकांनी प्रमाणित करून सहा. शिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी दि. २९/०६/२०१५, रोजी सर्व शिक्षा अभियान कार्यालयात हार्ड व सॉफ्ट कापी स्वत: सादर करावी.

सदर माहिती विहित मुदतीत सादर न केल्यास याची संपूर्ण जबाबदारी यूआरसी समन्वयक यांची राहिल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर :–**

1) मा. आयुक्त, म.न.पा नागपूर.
2) मा. राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप. मुंबई
3) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर

**प्रत – उचित कार्यवाहीस्तव :**

1) सहा. शिक्षणाधिकारी, म.न.पा. नागपूर
2) शाळा निरिक्षक झोन क्र. 1 ते 10,मनपा. नागपूर
3) शहर साधन केंद्र समन्वयक केंद्र क्र. 1 ते 5, मनपा. नागपूर
4) सर्व साधन व्यक्ती केंद्र क्र. 1 ते 5, मनपा. नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर